अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# यूपीएच्या मंत्र्यांचा ताल आणि तोलही गेला

घर फिरले की, घराचे वासेही फिरतात अशी परिस्थिती आज यूपीए सरकार आणि काँग्रेसची झाली आहे. केंद्रातल्या सत्तेतले मोजकेच दिवस शिल्लक असताना आपल्याच कर्माची कटू फळे खाण्याचा हव्यास यूपीए सरकारला झालेला दिसतो. भ्रष्टाचार आणि गैरकारभार यामुळे पूर्ण बदनाम झाल्यानंतरही जाता जाता पुन्हा गैरव्यवहाराचे नवे विक्रम पंतप्रधान मनमोहनसिंग आणि त्यांचे मंत्री करीत आहेत. गेल्या काही दिवसांत केंद्रीय मंत्रिमंडळातल्या दोन वजनदार मंत्र्यांनी त्यांच्याच विभागातल्या सचिवांची तडकाफडकी बदली करण्याचा प्रकार घडला. तर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीतच कृषिमंत्री शरद पवार यांची दुसऱ्या एका बड्या मंत्र्याबरोबर बरीच मोठी शाब्दिक चकमक झाली. याशिवाय केंद्रीय गुन्हे विभागाच्या म्हणजेच सीबीआयच्या अतिरिक्त संचालकपदी अनेक नियम आणि संकेत डावलून एका मर्जीतल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा प्रकार असाच वादग्रस्त ठरला आहे. आणि या सगळ्या आपापसातल्या धुमश्चक्रीकडे पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी इतके सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे की, महाभारतातल्या दुर्योधनाची आठवण यावी. इथे फक्त सगळे काही दिसून येत असूनही त्याकडे कानाडोळा करण्याचे कसब मनमोहनसिंग दाखवत आहेत आणि आपला आणि त्या वादग्रस्त प्रकरणाचा काहीच संबंध नाही असे दाखविण्याचा सालस प्रयत्न मनमोहनसिंग करीत आहेत. परंतु आपल्याच शासनाच्या गैरकारभाराकडे दुर्लक्ष करणे हासुध्दा गैरकारभारच ठरतो. आधीच काँग्रेसची परिस्थिती अगदी नाजूक असताना त्यांचेच मंत्री या पध्दतीने जाताजाता गैरकारभाराची वाजंत्री वाजवणार असतील तर येणाऱ्या निवडणुका पराभवाची ही नांदी म्हणावीच लागेल. मग केंद्रीय आरोग्य मंत्री गुलाम नबी आझाद यांनी ज्यांचे कौतुक केले त्याच कार्यक्षम अशा केशव देसीराजू यांची बदली करण्याचा प्रकार किंवा अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी केंद्रीय नगरविकास खात्याचे सचिव सुधीर कृष्णा यांचा मानसिक छळ करण्याची तक्रारही त्या गैरकारभाराची वानगीच म्हणावी लागेल.

## जाताजाता अवलक्षण

लोकसभा निवडणुकांना जेमतेम दोन महिने उरले असताना हातात असलेल्या थोड्याशा कालावधीत तरी चांगला कारभार करावा आणि जाता जाता आपला चांगला ठसा उमटावा असे मनमोहनसिंग यांना किंवा त्यांच्या मंत्र्यांना वाटू नये हे आश्चर्यच म्हणावे लागेल. आरोग्य विभागाचे सचिव हे सगळ्या केंद्रीय प्रशासनामध्ये एक उत्तम अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांची प्रतिमा स्वच्छ असल्यामुळे त्यांच्याविषयी आदरही असल्याचे सांगितले जाते. याच देसीराजू यांनी देशभर पल्स पोलिओची मोहीम अत्यंत यशस्वीपणे राबविली. त्यांच्या या कामाचे गुलाम नबी आझाद यांनी जाहीरपणे कौतुक केले होते. एवढेच नाही तर, त्यांचे अभिनंदन करून पाठही थोपटली होती. आता हेच देसीराजू आझाद यांना अचानक नकोसे का व्हावेत? कारण मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियामधल्या गैरकारभाराची लक्तरे टांगण्याचे काम करताच याच देसीराजूंना हटविण्याचे उद्योग आझाद यांनी केले आहेत. म्हणजेच गैरकारभाराविरुद्ध तोंड उघडले म्हणून त्यांना ही शिक्षा दिली गेली. तर नगरविकास खात्याच्या सचिवांबाबत चिदंबरम यांनी एक विनोदीच प्रकार केला आहे. त्यांचे इंग्रजी आपल्याला समजत नाही म्हणून चारचौघांमध्ये त्यांची टिंगल करण्याचा प्रकार मंत्र्यांकडून होऊ लागला. सुधीर कृष्णा हे इंग्रजी बोलता बोलता खूप हिंदी शब्द वापरतात. त्यांचे हिंदी आपल्याला समजत नाही अशी पोरकट कारणे सांगून त्यांनी कृष्णा यांचा एकाअर्थी मानसिक छळ केला. चिदंबरम आपला अशाप्रकारे वारंवार अपमान करतात अशी तक्रार कृष्णा यांनी त्याच्या खात्याचे मंत्री कमलनाथ यांच्याकडे केली आहे. एका मंत्र्यांचा गैरकारभार रोखला म्हणून एका सचिवाची हकालपट्टी होते. तर दुसऱ्या मंत्र्याला आयएएस झालेल्या सचिवांची हिंदी भाषा समजत नाही हे या सगळ्या घटना यूपीए सरकारच्या मंत्र्यांचा तोल सुटत असल्याच्याच निदर्शक ठरतात.

## दिवस भरल्याचे लक्षात

तिसरा तितकाच गंमतीचा आणि गंभीर प्रकार म्हणजे शरद पवार यांची टी बालू या मंत्र्यांबरोबर झालेली खडाजंगी! मंत्रिमंडळाच्या बैठकीत सबसिडी देण्याच्या मुद्यावरून वाद निर्माण झाला आणि शरद पवारांनी आणखी सबसिडी देण्याबाबत विरोध दर्शविला तेव्हा दुसऱ्या केंद्रीय मंत्र्याने पवारांबरोबर हुज्जत घातली. त्यावेळी यापुढे आपल्याला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीला बोलवू नका, असा इशाराच पवारांनी देऊन टाकला. याचाच अर्थ मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात आपापसात घमासान संघर्ष चालू आहे, हे दिसून येते. या फ्रिस्टाईल संघर्षावर सरकारचा प्रमुख म्हणून मनमोहनसिंग यांचेदेखील नियंत्रण राहिलेले नाही. एकूणच या यूपीए सरकारचे काही दिवसच शिल्लक राहिले असताना मंत्र्यांच्या वागणुकीमध्ये निर्माण झालेला हा बेतालपणा सरकारचाच तोल गेल्याचे स्पष्ट लक्षण ठरते आणि आपलेच हात दाखवून अवलक्षण करण्याचा तो अव्वल प्रकारही ठरतो. म्हणूनच एकदा जर का एखाद्या घराला वेगवेगळ्या कारणांनी घेरले तर त्यांचे जसे नुकसान होते तसे काँग्रेस नावाच्या राजकीय पक्षाचे झाले आहे. पराभवाच्या भीतीने पछाडलेल्या सरकारला आणि काँग्रेसला काहीच सुचेनासे झालेले दिसते. अन्यथा त्यांच्याकडून असे प्रकार होण्याची शक्यता नव्हती. अर्थमंत्री पदासाठी मोठी जबाबदारी सांभाळणाऱ्या चिदंबरमसारख्या मंत्र्यांनी एखाद्या आयएएस अधिकाऱ्याचा या पध्दतीने मानसिक छळ करावा हे निश्चितच धक्कादायक ठरते. इतकी वर्षे मंत्री राहून जर त्यांना हिंदी भाषा नीट समजत नसेल तर हा त्यांचा नव्हे राष्ट्रभाषेचाच अपमान ठरतो. अशा सगळ्या यूपीए सरकारच्या चित्रविचित्र कहाण्या या सरकारचे दिवस भरत असल्याचे सांगणाऱ्या म्हणाव्या लागतात.